अनुक्रमणिका

विषय	पृष्ठ
प्रकाशकाचे चार शब्द	
उपासकांनीं लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टी	
गणप्रत्यथर्वशीर्षम् व पूजेचे साहित्य	
१ गणेशाची आराधना	१
२ श्रीगणेश पूजाविधि	९
३ पार्थिव गणेशपूजा	३१
४ श्रीगणेशपूजा पौराणपूजाविधि	५७
५ श्रीगणेशनाममंत्र पूजा	७५
६ श्रीगोमयगणपतिविधानम्	८५
७ संकष्टीचतुर्थीचें व्रत	८७
८ नित्यपाठाचे श्लोक	८८
९ श्रीगणेश आराधना (गीत)	८९
१० श्रीगणेश अष्टोत्तरशत नामावलि	९०
११ आरती व भजन	९१ ते ९६

हे पुस्तक धार्मिक भावनेनें प्रकाशित केलें आहे. व्यावसायिक दृष्टी यांत अभिप्रेत नाहीं. म्हणून किंमत अत्यल्प ठेवली आहे.

वि. सू.—

वैदिक पूजानुष्ठान करणाऱ्या, अथर्वशीर्ष पठण करणाऱ्या भक्तांचे गळ्यांत यज्ञोपवीत (जानवें) अवश्य असावें.

उपासकांनीं लक्षांत ठेवण्यासारख्या कांहीं सामान्य परंतु महत्वाच्या गोष्टी

(१) गंध लावणें : करांगुळी जवळच्या बोटानें देवाला, मधल्या बोटानें स्वतःला गंध लावणें. देवाला हळद कुंकू सिंदूर इ. वहाणें तो आंगठा व मधली दोन बोटें यांनीं वहाणें. (२) देव ताम्हणांत घेण्यापूर्वी ताम्हण चांगलें विसळून घेणें किंवा असेल तर स्वतंत्र ताम्हण घ्यावें. म्हणजे तीर्थ उष्टें होणार नाहीं. (३) देव पुसण्याचें वस्त्र स्वच्छ असावें. त्याचा वापर स्वतःचें तोंड पुसण्यास करूं नये. (४) भाद्रपद चतुर्थी, सत्यनारायण वगैरे पूजेचे पूर्वी घरांतील देवांसमोर विडा ठेऊन नमस्कार करावा. आपल्यापेक्षां वडीलधाऱ्या माणसांना नमस्कार करून मगच पूजेला सुरवात करावी. (५) पूजा चालू असतांना इतरांनीं मोठ्यानें बोलूं नये. (६) श्रीगजाननाच्या आगमनापासून तेलाचा दिवा सतत लावून ठेवावा. वीज असेल त्या ठिकाणीं पूजेव्यतिरिक्त विजेचा दिवा चालेल. जेणें करून देवाला अंधारांत ठेऊं नये. विसर्जनानंतर त्या रात्रींही मखरांत दिवा असावा. (७) भाद्रपद चतुर्थीच्या सायंपूजेपूर्वी आंघोळ करणें आवश्यक आहे. (८) आरती बेसूर, फार मोठ्यानें व अशुद्ध म्हणूं नये. सुरांत म्हणावी. शक्य असेल तर तबला पेटीची साथ घ्यावी. मंत्रपुष्पही शुद्ध व बेताच्या आवाजानें म्हणावें. उगाच मोठ्यानें ओरडूं नये. (९) देवावर फुलें फेकूं किंवा उडवूं नयेत. (१०) पंचारती डाव्या बाजूकडून उजवीकडे ओंवाळावी. (११) निर्माल्य विसर्जनच्या वेळीं देवाबरोबर न्यावा. (१२) नित्यपूजेनंतर तीर्थ व निर्माल्य चांगल्या जागीं टाकावा. (१३) श्रीगणेशाला मोदक व लाडू प्रिय आहेत. शक्य असेल त्यांना ह्यापैकीं एकाचा तरी महा-नैवेद्य दाखवावा. (१४) सजावट वगैरे अवांतर खर्च खूप करून धार्मिक खर्चांत कपात करूं नये. (१५) घरांतून मूर्ति घेऊन निघतांना देवाबरोबर कांहीं तरी खाद्य पदार्थाची शिदोरी द्यावी. (१६) श्रीगणेश आराधना पूजेवरून स्वतःच पूजा करणाऱ्यांनीं कांहीं दक्षिणा व देवापुढील पैसे पुरोहितास द्यावेत किंवा श्रीमयूरेशप्रकाशनाला पाठवावे. त्यांचा उपयोग सत्कार्यासाठींच केला जाईल.

॥ अथ गणपत्यथर्वशीर्षम् ॥

शांतिमंत्र :—

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवा भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।
स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिर्व्यशेम देवहितं यदायुः ॥
ॐ स्वस्तिन इंद्रो वृद्धश्रवाः स्वस्तिनः पूषा विश्ववेदाः ।
स्वस्तिनस्तार्क्ष्योऽअरिष्टनेमिः स्वस्तिनो बृहस्पतिर्दधातु ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः

ॐ नमस्ते गणपतये । त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि । त्वमेव केवलं कर्तासि । त्वमेव केवलं धर्तासि । त्वमेव केवलं हर्तासि । त्वमेव सर्वं खल्विदं ब्रह्मासि । त्वं साक्षादात्मासि नित्यं ॥ १ ॥ ऋतं वच्मि सत्यं वच्मि ॥ २ ॥ अव त्वं मां । अव वक्तारं । अव श्रोतारं । अव दातारं । अव धातारं । अवानूचानमव शिष्यं । अव पश्चात्तात् । अव पुरस्तात् । अवोत्तरात्तात् । अव दक्षिणात्तात् । अव चोर्ध्वात्तात् । अवाधरात्तात् । सर्वतो मां पाहि पाहि समंतात् ॥ ३ ॥ त्वं वाङ्मयस्त्वं चिन्मयः । त्वमानंदमयस्त्वं ब्रह्ममयः । त्वं सच्चिदानंदाद्वितीयोसि । त्वं प्रत्यक्षं ब्रह्मासि । त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोसि ॥ ४ ॥ सर्वं जगदिदं त्वत्तो जायते । सर्वं जगदिदं त्वत्तस्तिष्ठति । सर्वं जगदिदं त्वयि लयमेष्यति । सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति । त्वं भूमिरापोऽनलोऽनिलो नभः । त्वं चत्वारि वाक्पदानि ॥ ५ ॥ त्वं गुणत्रयातीतः । त्वं देहत्रयातीतः । त्वं कालत्रयातीतः । त्वं मूलाधारस्थितोऽसि नित्यं । त्वं शक्तित्रयात्मकः । त्वां योगिनो ध्यायन्ति नित्यं । त्वं ब्रह्मा त्वं विष्णुस्त्वं रुद्रस्त्वमिंद्रस्त्वमग्निस्त्वं वायुस्त्वं सूर्यस्त्वं चंद्रमास्त्वं ब्रह्मभूर्भुवः स्वरोम् ॥६॥ गणादिं पूर्वमुच्चार्य वर्णादिं तदनंतरम् । अनुस्वारः परतरः । अर्धेन्दुलसितं । तारेण ऋद्धं । एतत्तव मनुस्वरूपम् । गकारः पूर्वरूपं । अकारो मध्यमरूपं । अनुस्वारश्चान्त्यरूपम् । बिंदुरुत्तररूपम् । नादः संधानम् । संहिता संधिः । सैषा गणेशविद्या । गणक ऋषिः । निचृद्गायत्री छंदः । गणपतिर्देवता । ॐ गं गणपतये नमः ॥ ७ ॥ एकदंताय विद्महे वक्रतुंडाय धीमहि । तन्नो दंतिः प्रचोदयात् ॥ ८ ॥ एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम् । रदं च वरदं हस्तैर्बिभ्राणं मूषकध्वजम् ।

रक्तं लंबोदरं शूर्पकर्णकं रक्तवाससम् । रक्तगंधानुलिप्तांगं रक्तपुष्पैः सुपूजितम् । भक्तानुकम्पिनं देवं जगत्कारणमच्युतम् । आविर्भूतं च सृष्ट्यादौ प्रकृतेः पुरुषात्परम् । एवं ध्यायति यो नित्यं स योगी योगिनां वरः ॥ ९ ॥ नमो व्रातपतये नमो गणपतये नमः प्रमथपतये नमस्तेऽस्तु लंबोदरायैकदंताय विघ्ननाशिने शिवसुताय वरदमूर्तये नमः ॥ १० ॥

एतदथर्वशीर्षं योऽधीते । स ब्रह्मभूयाय कल्पते । स सर्वविघ्नैर्न बाध्यते । स सर्वतः सुखमेधते । स पंचमहापापात्प्रमुच्यते । सायमधीयानो दिवसकृतं पापं नाशयति । प्रातरधीयानो रात्रिकृतं पापं नाशयति । सायं प्रातः प्रयुंजानो अपापो भवति । सर्वत्राधीयानोऽपविघ्नो भवति । धर्मार्थकाममोक्षं च विंदति । इदमथर्वशीर्षमशिष्याय न देयं । यो यदि मोहाद्दास्यति स पापीयान् भवति । सहस्रावर्तनात् । यं यं काममधीते तं तमनेन साधयेत् । अनेन गणपतिमभिषिंचति । स वाग्मी भवति । चतुर्थ्यामनश्नञ्जपति । स विद्यावान् भवति । इत्यथर्वणवाक्यम् । ब्रह्माद्यावरणं विद्यात् । न बिभेति कदाचनेति । यो दूर्वांकुरैर्यजति । स वैश्रवणोपमो भवति । यो लाजैर्यजति स यशोवान्भवति । स मेधावान् भवति । यो मोदकसहस्रेण यजति स वांछितफलमवाप्नोति । यः साज्यसमिद्भिर्यजति स सर्वं लभते स सर्वं लभते । अष्टौ ब्राह्मणान् सम्यग्ग्राहयित्वा सूर्यवर्चस्वी भवति । सूर्यग्रहे महानद्यां प्रतिमासंनिधौ वा जप्त्वा सिद्धमंत्रो भवति । महाविघ्नात्प्रमुच्यते । महादोषात्प्रमुच्यते । महापापात्प्रमुच्यते । स सर्वविद्भवति । स सर्वविद्भवति । य एवं वेद । इत्युपनिषत् । भद्रंकर्णेभिः० । स्वस्तिन० । सहनाववतु । सहनौ भुनक्तु । सहवीर्यं करवावहै । तेजस्विनावधीतमस्तु । मा विद्विषावहै । ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

[आवर्तन म्हणतांना " ॐ नमस्ते गणपतये " येथपासून " वरदमूर्तये नमः " येथपर्यंत म्हणावयाचें म्हणजे १ आवर्तन झालें. याप्रमाणें इष्ट संख्येइतकीं आवर्तनें म्हणावीं व शेवटीं फक्त १ वेळ ' एतदथर्वशीर्षं० ' पासून खालील फलश्रुति म्हणावी. (२१ आवर्तनांची १ एकावर्तनी)]

" इति गणपत्यथर्वशीर्षं समाप्तम् "

नित्यपूजेचें साहित्य.

दोन पाट, शुद्ध पाण्यानें भरलेला कलश [तांब्या] पळी, भांडें, ताम्हणें २ एक देवाचे स्नानादि उपचारांकरितां व दुसरें उदक सोडणें वगैरे करतां. स्नानानंतर विशेष कोठें स्पर्श न करतां, सोवळें (पीतांबर मुकटा धावळी) अथवा धूतवस्त्र नेसावें. गळ्यांत यज्ञोपवीत (जानवें) असावें. गंध, अक्षता, फुलें, दूर्वा, सिंदूर, हळद, कुंकूं, कापूर (असल्यास) उदबत्ती, नीरांजन, नैवेद्याकरतां दूध, गूळ, साखर, केळें वगैरे कांहीं तरी असावें.) साधारणपणें नित्य-(रोजच्या) पूजेचें स्थान एकच व शुद्ध पवित्र असावें. पूजेकरितां देवतासंमुख, पूर्वाभिमुख किंवा उत्तराभिमुख बसावें.

भाद्रपद गणेश चतुर्थीच्या पूजेचें साहित्य.

श्रीगणेशाची पार्थिव मूर्ति ज्या ठिकाणीं मांडावयाची तें स्थान शुद्ध पवित्र व सुशोभित करावें. उंच असावें. पाट अगर चौरंग, असावा. त्याचेखालीं थोड्या अक्षता ठेवाव्या. सोवळें (पीतांबर, मुकटा) किंवा धूतवस्त्र नेसावें. गळ्यांत यज्ञोपवीत जानवें असावें. शुद्धपाण्यानें भरलेला कलश (तांब्या) पळी भांडें, ताम्हण, दिवा, समई, पंचामृत एकत्र–अथवा–दूध, दहीं, तूप, मध, साखर निरनिराळें कचोळ्यांत ठेवावें. अत्तर, कढत पाणी (एका भांड्यांत) कापसाचीं देवास वाहावयाचीं वस्त्रें, देवाकरतां जानवें, गंध, अक्षता (धुतलेले तांदूळ) हळद, कुंकूं, सिंदूर, सुगंधी फुलें, पत्री (जी मिळेल ती. पुढें पूजेंत पत्रीचीं नांवें दिलीं आहेत.) दूर्वांच्या जुड्या २१ च्या दोन. एक पूजेकरतां व दुसरी शेवटीं नाममंत्रानें वाहण्याकरतां. कापूर, उदबत्ती, उदबत्तीचें घर, नीरांजन, काडवाती, नैवेद्याकरतां गूळ, खोबरें, दूध, केळें, पेढे वगैरे. नारळ एक. केळीं वगैरे पांच प्रकारचीं फळें. किरकोळ खर्चाकरतां व ब्राह्मण दक्षिणेकरतां यथाशक्ति द्रव्य. विड्यांचीं पानें १० सुपाऱ्या ५ याप्रमाणें साहित्य तयार ठेवून एकाग्र चित्तानें बसणें.

★

॥ श्रीः ॥

श्रीगणेशाची आराधना

ॐ जयजयाजी गणनाथा । तूं विद्यावैभवें समर्था ।
अध्यात्मविद्येच्या परमार्था । मज बोलवावें ॥ १ ॥
नमूं शारदा वेदजननी । सकळ सिद्धि जयेचेनी ।
मानस वर्तलें मननीं । स्फूर्तिरूपें ॥ २ ॥
आतां आठवूं सद्गुरु । जो पराचाहि परु ।
जयाचेनि ज्ञानविचारु । कळों लागे ॥ ३ ॥

श्रीदासबोध ३।१०।३

मनुष्यानें स्वतःचें कर्तव्य काय व स्वहित कशांत आहे याचा प्रथम विचार करावा. शास्त्र व संतसज्जन यांचा उपदेश श्रवण करून तदनुसार वर्तन करणें यांतच त्याचें खरें कल्याण आहे. उच्छृंखलपणा, स्वैरवर्तन यानें नाश होतो. संसारांत किंवा मोक्षमार्गांत देवतेची उपासना–म्हणजे कोणत्याही इष्टदेवतेची आराधना–हा मोठा आधार असतो. संसारांत अनेक प्रकारचे अनेक आघात होत असतात. त्यांचें देवतेच्या कृपेनें निरसन होतें.

समर्थ म्हणतातः–

" उपासनेचा मोठा आश्रयो । उपासनेवीण निराश्रयो ॥ "

मोक्षमार्गांतही साधकापुढें अनेक अंतराय म्हणजे विघ्नें येतात, संकटें येतात, आपत्ति ओढवतात. क्षुद्रदेवताकृत किंवा मनुष्यकृत उपद्रव साधकाला उपासनेपासून भ्रष्ट करण्याकरतां सुरू होतात. अशा प्रसंगीं साधकानें मन खंबीर ठेवावें. उपास्यदेवतेवरची श्रद्धा तिळमात्र ढळूं देऊं नये. कितीही संकटांचे पर्वत कोसळोत, देव माझें रक्षण करील ही दृढ भावना असावी. याविषयीं समर्थांच्या दोन ओंव्या देऊन विषयाकडे वळतों.

समर्थ म्हणतात :–

" देव म्हणजे आपला प्राण । प्राणासी न करावें निर्वाण ।
ऐसी प्रीती जीवैंभावें पूर्ण । भगवंतीं लागावी ॥
देवें भक्त कोण वधिला । देखिला ना ऐकिला ।
शरणागतासी जाहला । वज्रपंजरू ॥
तसेंच –
देव अनाथांचा कैपक्षी । नाना संकटांपासून रक्षी ॥
देवास भक्ताचा विसरू । पडणार नाहीं ॥

(दासबोध–सख्यभक्ति)

अर्थात् आपणही देवाला न विसरतां दृढश्रद्धा ठेवून त्याचेठिकाणीं प्रेमलक्षणाभक्तीनें अनन्य असावें. अशी ही प्रेमलक्षणा भक्ति उत्पन्न होण्याचें मुख्य आणि पहिलें साधन जर कोणतें असेल तर तें ' पूजा ' हें होय.

उपासनेंत इष्टदेवतापूजन हें प्रधान अंग आहे.

' तेन हि देवता संतुष्यति, श्रद्धया कृतपूजनेन आत्मनि दृढविश्वास आह्लादश्च समुत्पद्यत इति प्रत्यहं देवतापूजनं अवश्यं कर्तव्यमेव ।

(श्रीसूक्तविधान पूजाविधी)

पूजेनें देवता संतुष्ट होते. आपल्या मनाला समाधान व शांति लाभते. देवतेच्या सन्निध बसून, देवतेची मूर्ति समोर आणून नुसतें गंधपुष्प समर्पण केलें तरी आनंद होतो. मन उल्हसित होतें. इष्टदेवतेच्या नित्य पूजनानें देवाविषयीं आदर व ' देव माझा, मी देवाचा ' असा प्रेमांकुर उत्पन्न होऊन वाढीस लागतो. मन क्षणभर तल्लीन होतें. याचा अनुभव भाविकांनीं अवश्य घ्यावा. यासाठीं कोणत्याही इष्ट देवतेच्या पूजनाला उपयुक्त होईल अशी माहिती प्रथम देतों.

ज्या वास्तूंत आपण आपल्या मुलाबाळांसह रहावयाचें त्यांत रक्षणकर्त्री देवता अवश्य असावी. देवता हें संसारांत येणाऱ्या आपत्तींविषयीं निवेदन

करण्याचें व त्यांपासून आपलें रक्षण व्हावें या याचनेचें प्रमुख स्थान आहे. या हेतूनेंच पूर्वीं घर बांधतांना देवगृहाची योजना केली जात असे. आज लाखों रुपये खर्च करून टोलेजंग इमारती उभारल्या जातात, पण त्यांत देवगृहाला स्थान नसतें. हा कालमहिमा ! देवगृह म्हणजे देवघर, देव ठेवण्याची जागा. ही स्वच्छ आणि नीटनेटकी असावी. पूजनाकरितां बसलें असतां एकान्त लाभेल, चित्त एकाग्र होईल अशा जागेची योजना असावी. पूजेची जागा स्वच्छ गोमयानें सारवून, रंगावल्यादिकांनीं शोभिवंत केलेली व पवित्र असावी. देवाच्या सन्मुख, प्राङ्मुख वा उदङ्मुख बसावें. आपल्यापेक्षां देवाचें आसन उंच असावें. स्नानादि उपचारांसाठीं देवाला ताम्हनांत घेतलें तर तें ताम्हन पाटावर ठेवावें. आपल्यापेक्षां खालीं–जमिनीवर–ठेवूं नये. देव आपल्यापेक्षां मोठा आहे, ही भावना मनामध्यें बाळगावी. आपण पाट, कृष्णाजिन किंवा कंबलासनावर बसावें. प्रातःकाल हा सत्त्वगुणवर्धक असल्यानें शक्यतों प्रातःकालीं पूजा करण्यानें एकप्रकारें सात्त्विक भाव व आनंद प्राप्त होतो. हा अनुभव प्रत्येकानें स्वतःच घ्यावयाचा आहे.

पूजेविषयीं सामान्य नियम :–

प्रातःकालीं मुखमार्जनोत्तर स्नान करून शुद्ध, पवित्र सोवळें अगर धूतवस्त्र नेसावें. आसनावर बसून आचमन करून भस्म, गोपीचंदन अगर मंगल तिलक लावावा. संध्यादि कर्म करावें. निदान आचमन–प्राणायाम करून गायत्री मंत्रानें तीन अर्घ्यें व दहा वेळां गायत्रीजप करावा. यावांचून दुसरें कर्म करण्याचा अधिकार प्राप्त होत नाहीं. देवपूजा करीत असतांना मध्यें कांहीं खाऊं पिऊं नये. खाल्लेंच तर मुखप्रक्षालन करून आचमन करून पूजा पुढें चालू करावी. देवांची पूजा जेवणापूर्वींच झाली पाहिजे. उपचार वाहतांना मन देवाकडे असावें. भांडणें, ओरडणें, अश्लील शब्द उच्चारणें वर्ज्य करावें. देवाच्या पूजेचे १–२–३–५–१०–१६–३२–४८–६४–८० उपचारसमर्पणापर्यंत अनेक भेद आहेत.

सामान्यत: " **षोडशोपचार पूजा** " हाच शास्त्रविहित विधि म्हणून आचरला जातो. याकरितां येथें त्याचेंच स्पष्टीकरण करतों.

(श्रीसूक्तविधान या पुस्तकांत मीं सविस्तर माहिती दिली आहे ती पहावी.)

(१) आवाहन. (२) आसन. (३) पाद्य. (४) अर्घ्य. (५) आचमन. (६) स्नान. (अभिषेक). (७) वस्त्र. (८) उपवस्त्र. (९) गंध. (१०) पुष्प. (११) धूप. (१२) दीप. (१३) नैवेद्य (१४) प्रदक्षिणा. (१५) नमस्कार. (१६) मंत्रपुष्प. हे मुख्य षोडशोपचार होत. यांत उपांग म्हणून विशेष प्रसंगीं करावयाचे उपचार येतात. ते असे—**स्नान**--या उपचारांत पंचामृत, गंधोदक, अभ्यंग, अभिषेक यांचा समावेश होतो. **गंध**--या उपचारांत हळद, कुंकूं, सिंदूर, बुक्का परिमलद्रव्य (अत्तर) अक्षता हे पदार्थ येतात. **पुष्प**--या उपचारांत बेल,' तुळसी, दूर्वा, शमी हे येतात. **नैवेद्य**--यांत मुखवासाकरितां तांबूल, फल, दक्षिणा हे विषय येतात. **मंत्रपुष्प**--यांत कापूर, काडवाती, आरती येते. रोजच्या पूजेंत हे सर्व उपचार असावेत असें नाहीं. वर लिहिलेले षोडशोपचार समर्पण करणें हें प्रधान समजावें. आतां प्रत्येक उपचाराबद्दल माहिती देतों.

आवाहन :—आवाहन म्हणजे देवतेला बोलाविणें. नेत्र मिटून इष्ट देवतेची मूर्ति मनांत आणून पुष्प, तुलसी अगर दूर्वा घेऊन, समोरच्या प्रतिमेंत देवता आली अशी भावना करून तें पुष्प अगर पत्र देवतेवर ठेवावें.

आसन :—देवतेला बसण्याकरितां अक्षता, तुळसीपत्र, दूर्वा, बेल, शमी यांपैकीं कांहींही अर्पण करावें. (ज्या देवतेला जें प्रिय असेल तें अर्पावें)

पाद्य :—देवाचे पाय धुण्यासाठीं देवाचे पायावर शुद्ध पाणी पळीनें घालावें. मृत्तिका, फोटो किंवा तत्सदृश मूर्ति असल्यास पुष्पानें पायावर थोडें मार्जन करावें.

अर्घ्य :—पळींत अगर अर्घ्यपात्रांत गंध, अक्षता, पुष्प, दूर्वा, दर्भ, फल, इत्यादि घालून तें पाणी मस्तकावर द्यावें. ('तदर्घ्यं मूर्ध्नि चार्पयेत्' असें महोदधि म्हणतो.) कोणी अर्घ्य हातावर देतात.

आचमन :—पुनः चांगलें शुद्ध पाणी घेऊन तें देवाचे मुखापाशीं अर्पण करावें.

स्नान :—स्वच्छ शुद्ध पाण्यानें देवाला आंघोळ घालणें. पंचामृतादि स्नान हा विशेष उपचार असल्यानें रोजच्या पूजेंत तो असावाच असें नाहीं. भावना, श्रद्धा यांवर सारें अवलंबून आहे. अभ्यंगस्नान घालतांना अत्तर देवाचे मस्तकापासून खालीं चरणांपर्यंत लावीत यावें. अभिषेक म्हणजे देवावर पाण्याची संततधार धरणें. त्याकरितां गव्याचें शिंग, शंख अथवा तांब्याचें अभिषेकपात्र असावें. ताम्रपात्र हें सर्व देवांना अत्यंत प्रिय आहे. " ताम्रे देवाः प्रमोदन्ते ताम्रे देवाः प्रतिष्ठिताः ॥ " अभिषेकपात्र एक, अकरा किंवा सहस्र धारांचें असावें. अभिषेकसमयीं पुरुषसूक्त, रुद्र, पवमान, अथर्वशीर्ष, सौर, श्रीसूक्त इत्यादि वैदिक सूक्तें व 'सुरास्त्वां' इत्यादि पौराणमंत्र यथासंभव म्हणावे. अभिषेकाच्या पाण्यांत वाळा, अत्तर, केशर इत्यादि सुगंधी द्रव्यें कोणी घालतात. मृत्तिकादि मूर्तींवर दूर्वेनें वा फुलानें मधून मधून थोडें पाणी शिंपडणें. अभिषेकसमयीं घंटा अगर तत्सम वाद्य वाजवावें.

वस्त्र :—अभिषेकानंतर स्वच्छ वस्त्रानें देवाला पुसावें व नित्याच्या जागेवर तुळसीपत्र, दूर्वा, बेल यांपैकीं योग्य तें ठेवून त्यावर देवाला बसवावें. नंतर वस्त्र अर्पण करावें. वस्त्र स्वच्छ व धूत असावें. वस्त्राभावीं तुळसीपत्र, दूर्वा, फूल, अक्षता यांपैकीं काहींही अर्पण करावें. अलंकार व वस्त्रें हीं निर्माल्य होत नसल्यानें पुनः पुनः समर्पण करण्यास प्रत्यवाय नाहीं.

उपवस्त्र :–उपवस्त्र म्हणजे अंगावरचा शेला वगैरे किंवा यज्ञोपवीत द्यावें. रोजच्या पूजेंत अक्षतादि समर्पण करतात.

गंध :–श्रीविष्णूला तुलसीकाष्ठाचें, श्रीगणपतीला रक्तचंदनाचें व इतर सर्व देवांना चंदनाचें गंध प्रिय आहे. अष्टगंध असल्यास अर्पण करावें.

अक्षता :–शालिग्राम शिलेवांचून अन्य देवांना अक्षता वहाव्या. याचवेळीं देवीला हळद, कुंकूं, बांगड्या, गळेसरी, काजळ, भूषणें इत्यादि उपचार वहावे. सर्व देवांना परिमलद्रव्यें अर्पावीं.

पुष्पें :–शिळीं–सुकलेलीं, चिखलांत पडलेलीं, चुरलेलीं, अपवित्र पदार्थानें दूषित झालेलीं, दुर्गंध येत असलेलीं वर्ज्य करावींत. स्वच्छ, सुवासिक अशीं त्या त्या ऋतूंमध्यें उत्पन्न होणारीं फुलें वहावींत. शंकराला केतक वाहूं नये. सूर्याला बेल, अगस्तिपुष्प, तगरपुष्प वाहूं नये. गणपतीला तुळसी वाहूं नये. देवीला रुई, मंदारपुष्प वाहूं नये. दुर्गानांवाच्या देवीला दूर्वा निषिद्ध आहेत. तदितर देवींना त्या वहाण्यास प्रत्यवाय नाहीं. फुलांच्या बाबतींत शेवटीं ग्रंथकारांनीं असा निष्कर्ष काढला आहे कीं विहित पुष्पांचा अभाव असतांना ज्यावेळीं जीं फुलें उपलब्ध असतील तीं वहावींत. फुलें वाहतांना तीं जशीं उत्पन्न होतात तशींच वहावीं. म्हणजे देंठ वर करून उलटीं वाहूं नयेत. बेल, तुळस उपडी वहावी. दूर्वा स्वतःकडे अग्रें करून अर्पण कराव्या. गणपतीला तांबडीं फुलें, जास्वंद, तांबडें कमळ, मंदारपुष्प, दूर्वा, शमी हीं अत्यंत प्रिय आहेत. विष्णूला तुळसीपत्र, शंकराला बेल, महालक्ष्मीला बेल अत्यंत प्रिय आहेत. द्वादशीचे दिवशीं तुळस व रविवारीं दूर्वा काढूं नयेत. तुळस दहा दिवसांपर्यंत शिळी होत नाहीं. सर्व तऱ्हेच्या फुलांचा अभाव असतां विष्णूला तुळसीपत्र अर्पण केल्यानें पूजा पूर्ण होते.

धूप :–धूप म्हणजे चंदनादि सुगंधी काष्ठांचें चूर्ण, कीं जें अग्नीवर टाकलें असतां सुगंध दरवळेल. धूपपात्र देवाच्या समोर अगर डावीकडे ठेवावें. धूपाच्या सुगंधानें देवता सुप्रसन्न होऊन सन्निध वास करते. म्हणूनच

कर्माच्या आरंभापासून जप करतांना शिष्ट लोक धूप जाळतात. धूप ओवाळतांना घंटा वाजवावी.

दीप :—तूप अगर तेल यांचा दिवा असावा. तुपाचा दिवा (नीरांजन) देवाच्या उजव्या बाजूला व तेलाचा डाव्या बाजूस असावा. दिव्याचें तोंड दक्षिणेकडे करूं नये. अनेक दीप अगर वाती असतील तेव्हां हा निषेध नाहीं. नीरांजन मधलें बोट, करांगुलीजवळचें बोट आणि अंगठा यांनीं धरून देवाच्या नाभीपासून किंवा पायापासून दृष्टीपर्यंत सहा वेळां ओवाळावें.

नैवेद्य :—'यत्करोषि यदश्नासि' या गीतावचनानुसार आपण जो पदार्थ भक्षण करावयाचा तो मनानें तरी देवाला अर्पण करून खावा, असें आहे. त्या त्या देवतेला विशिष्ट पदार्थाचा नैवेद्य प्रिय आहे. पण रोजच्या पूजेंत दूध, गूळ, साखर, केळें, फळ वगैरे जें असेल त्याचा नैवेद्य दाखवावा. अगदींच काहीं नसेल (प्रवासांत वगैरे) तर 'सलिलमपि दद्यात्' म्हणजेच शुद्ध पाणी नैवेद्य म्हणून समर्पण करावें. नैवेद्यपात्राचे खालीं पाण्याचें चौकोनी मंडल करावें. नैवेद्य दाखवितांना मौन ठेवून, देवाची मूर्ति डोळ्यांपुढें आणून 'प्राणाय स्वाहा' इत्यादि सहा मंत्र म्हणतांना प्रत्येक मंत्रानें देवाला घांस द्यावयाचा आहे. नैवेद्य पदार्थावर तुलसीपत्र ठेवावें. गणपतीला नैवेद्य अर्पण करतांना दूर्वांकुर ठेवावा. घरांत रोज देवाला नैवेद्य झालाच पाहिजे. त्यावांचून भोजन करणें निंद्य होय.

तांबूल–फल–दक्षिणा :—हे उपचार रोजच्या पूजेंत आवश्यक नाहींत. दोन अगर पांच पानें उताणीं ठेवून त्यावर सुपारी ठेवून विडा देण्याची पद्धती आहे. वस्तुतः आपण खातों त्याप्रमाणें कात, चुना, वेलची, सुपारी वगैरे घालून विडा तयार करून अर्पण करणें योग्य. मुखवास–किंवा मुखवासन म्हणजे ज्याचें भक्षण केलें असतां मुख वासित म्हणजे

सुवासित—आरक्तोष्ठ होतें. विडा ठेवतांना पानांचीं अग्रें आपणाकडे व देंठ देवाकडे करून ठेवावा.

केळें, नारळ, मोसंबी इत्यादि जें आपणाजवळ असेल तें देवाला समर्पण करावें. फळ देवाचे संमुख ठेवावें. पूजासांगतेसाठीं दक्षिणा देवापुढें ठेवून नंतर ती ब्राह्मणाला द्यावी.

प्रदक्षिणा :—देवाचे उजवीकडून हळूहळू पावलें टाकीत प्रदक्षिणा घालावी. धांवत घालूं नये. देवाचे सभोंवार फिरण्यासाठीं जागा नसेल तर स्वतःभोंवतीं उजवीकडून फिरत प्रदक्षिणा घालावी. मुखानें देवाचें नांव वा स्तोत्र म्हणावें.

नमस्कार :—देवापुढें साष्टांग किंवा पंचांग नमस्कार घालावा. दोन हात, दोन पाय, मस्तक, छाती व दोन्ही गुडघे जमिनीला लावून नमस्कार करणें हा साष्टांग नमस्कार होय. पंचांग म्हणजे दोन हात, दोन पाय आणि मस्तक जमिनीला लावून नमस्कार करणें. शरीराच्या अस्वास्थ्यामुळें किंवा स्थूलपणा, वृद्धपणा इत्यादींमुळें वरीलप्रमाणें नमस्कार करणें अशक्य असेल तर देवापुढें किंचित नम्र होऊन, मस्तक वांकवून दोन हात जोडावे. नमस्कार करण्यांत देवाजवळ नम्रभाव व्यक्त झाला पाहिजे. ताठ उभें राहून एका हातानें नमस्कार करूं नये.

मंत्रपुष्प :—गंध—अक्षतांसह ओंजळभर फुलें घेऊन देवाला समर्पण करावीं. नंतर विविध स्तोत्रपाठ–प्रार्थनेचे श्लोक म्हणून पूजा पूर्ण करावी. शेवटीं देवाचें तीर्थ घ्यावें. त्यानें आयुष्य व आरोग्य वाढतें. यानंतर देवाचा निर्माल्य शुद्धस्थळीं टाकावा.

याप्रमाणें ही षोडशोपचार पूजेची माहिती दिली आहे. ही कोणत्याही देवाच्या पूजेला उपयोगी होईल.

★

अथ गणेशनित्यपूजाविधिः

रोज स्नान–संध्यादि नित्य कर्मानंतर देवतासंमुख अगर देवाचें उजवीकडे प्राङ्मुख किंवा उदङ्मुख (उत्तरेकडे मुख) बसावें. वस्त्र शुचिर्भूत म्हणजे सोवळें निदान धूतवस्त्र तरी असावें. मन सुप्रसन्न ठेवावें. जवळ पाण्यानें भरलेला कलश, पळीभांडें, पाणी सोडण्याकरितां ताम्हन व पूजासाहित्य असावें. शक्यतर आरंभापासून समई–दिवा लावावा. आचमन करून पूर्वीं भस्म वगैरे कांहीं लावलें नसल्यास लावावें. किंवा पिंजर लावावी. नंतर स्वस्थ चित्तानें आचमन करणें. तें असें:–

आचमन—पुढील तीन नांवांनीं एक एक पळी पाणी उजव्या तळहातावर घेऊन प्राशन करावें आणि चौथ्या नांवानें हात धुवावेत.

ॐ केशवाय नमः । ॐ नारायणाय नमः । ॐ माधवाय नमः ।

आणि मग वर हात जोडून पुढील नांवें क्रमानें म्हणावीं—

ॐ गोविंदाय नमः । ॐ विष्णवे नमः । ॐ मधुसूदनाय नमः ।
ॐ त्रिविक्रमाय नमः । ॐ वामनाय नमः । ॐ श्रीधराय नमः ।
ॐ हृषीकेशाय नमः । ॐ पद्मनाभाय नमः । ॐ दामोदराय नमः ।
ॐ संकर्षणाय नमः । ॐ वासुदेवाय नमः । ॐ प्रद्युम्नाय नमः ।
ॐ अनिरुद्धाय नमः । ॐ पुरुषोत्तमाय नमः । ॐ अधोक्षजाय नमः ।
ॐ नारसिंहाय नमः । ॐ अच्युताय नमः । ॐ जनार्दनाय नमः ।
ॐ उपेंद्राय नमः । ॐ हरये नमः । ॐ श्रीकृष्णाय नमः ।

प्राणायामः— प्रणवस्य परब्रह्मऋषिः । परमात्मा देवता । दैवीगायत्री छन्दः । (सप्तानां व्याहृतीनां विश्वामित्र–जमदग्नि – भरद्वाज – गौतम–अत्रि – वसिष्ठ – कश्यपा ऋषयः । अग्निवाय्वादित्य–बृहस्पति–वरुणेन्द्र–विश्वेदेवा देवताः । गायत्र्युष्णिगनुष्टुप् बृहतीपंक्तित्रिष्टुब्जगत्यश्छन्दांसि । गायत्र्या विश्वामित्र ऋषिः । सविता देवता । गायत्री छंदः । गायत्रीशिरसः प्रजापतिऋषिः । ब्रह्माग्निवाय्वादित्या देवताः । यजुश्छंदः) प्राणायामे विनियोगः ।

१ प्राणायामाचे वेळीं एवढा मोठा छंदर्षि वस्तुतः म्हटला पाहिजे, पण पुष्कळ ठिकाणीं न म्हणण्याचा प्रघात आहे, म्हणून आम्ही कंसांत दिला आहे.

ॐ भूः । ॐ भुवः । ॐ स्वः । ॐ महः । ॐ जनः । ॐ तपः । ॐ सत्यम् । ॐ तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि । धियो यो नः प्रचोदयात् (याला गायत्री मंत्र म्हणतात.) ॐ आपोज्योतीरसोमृतं ब्रह्मभूर्भुवः स्वरोम् । (यावेळीं उजव्या हातानें दोन कान व नासिका यांना स्पर्श करण्याचा प्रघात आहे. यांत मूळ बीज वेगळें आहे.) याप्रमाणें आचमन प्राणायाम झाल्यावर पुढीलप्रमाणें देवतानमस्कार करावा.

देवतानमस्कार :— ॐ श्रीमन्महागणाधिपतये नमः । इष्टदेवताभ्यो नमः । कुलदेवताभ्यो नमः । ग्रामदेवताभ्यो नमः । वास्तुदेवताभ्यो नमः । शचीपुरंदराभ्यां नमः । उमामहेश्वराभ्यां नमः । मातापितृभ्यां नमः । काल्कामपरशुरामेभ्यो नमः ।। सर्वेभ्यो देवेभ्यो नमः । सर्वेभ्यो ब्राह्मणेभ्यो नमः । एतत्कर्मप्रधानदेवताभ्यो नमः अविघ्नमस्तु ।

याप्रमाणें सर्व देवांना हात जोडून नमस्कार करावा.

सुमुखश्चैकदन्तश्च कपिलो गजकर्णकः ।
लम्बोदरश्च विकटो विघ्ननाशो गणाधिपः ॥
धूम्रकेतुर्गणाध्यक्षो भालचन्द्रो गजाननः ।
द्वादशैतानि नामानि यः पठेच्छृणुयादपि ॥
विद्यारंभे विवाहे च प्रवेशे निर्गमे तथा ।
संग्रामे संकटे चैव विघ्नस्तस्य न जायते ॥
शुक्लाम्बरधरं देवं शशिवर्णं चतुर्भुजम् ।
प्रसन्नवदनं ध्यायेत् सर्वविघ्नोपशान्तये ॥
सर्वमङ्गलमाङ्गल्ये शिवे सर्वार्थसाधिके ।
शरण्ये त्र्यम्बके गौरि नारायणि नमोऽस्तु ते ॥
सर्वदा सर्वकार्येषु नास्ति तेषाममङ्गलम् ।
येषां हृदिस्थो भगवान् मङ्गलायतनं हरिः ॥
तदेव लग्नं सुदिनं तदेव ताराबलं चन्द्रबलं तदेव ।
विद्याबलं दैवबलं तदेव लक्ष्मीपते तेंऽघ्रियुगं स्मरामि ॥
लाभस्तेषां जयस्तेषां कुतस्तेषां पराजयः ।
येषामिन्दीवरश्यामो हृदयस्थो जनार्दनः ॥

विनायकं गुरुं भानुं ब्रह्मविष्णुमहेश्वरान् ।
सरस्वतीं प्रणौम्यादौ सर्वकार्यार्थसिद्धये ॥
अभीप्सितार्थसिद्ध्यर्थं पूजितो यः सुरासुरैः ।
सर्वविघ्नहरस्तस्मै गणाधिपतये नमः ॥
सर्वेष्वारब्धकार्येषु त्रयस्त्रिभुवनेश्वराः ।
देवा दिशन्तु नः सिद्धिं ब्रह्मेशानजनार्दनाः ॥

देशकालोच्चारणम्:—श्रीमद्भगवतो महापुरुषस्य विष्णोराज्ञया प्रवर्तमानस्य अद्य ब्रह्मणः द्वितीये परार्धे विष्णुपदे श्रीश्वेतवाराहकल्पे वैवस्वतमन्वन्तरे कलियुगे कलिप्रथमचरणे अष्टाविंशतितमे युगे भरतवर्षे भरतखंडे जम्बुद्वीपे इशुपात रामक्षेत्रे बौद्धावतारे गोदावर्याः दक्षिणे तीरे शालिवाहनशके अमुकनाम संवत्सरे (पंचांगाचे मुखपृष्ठावर संवत्सराचें नांव असतें तें पाहून म्हणावें.) अमुकायने (भाद्रपदांत दक्षिणायन असतें) अमुकऋतौ अमुकमासे अमुकपक्षे अमुकतिथौ अमुकवासरे अमुकदिवसनक्षत्रे अमुकस्थिते वर्तमाने चंद्रे अमुकस्थिते श्रीसूर्ये अमुकस्थिते देवगुरौ शेषेषु ग्रहेषु यथायथं राशिस्थानस्थितेषु सत्सु एवंगुणविशेषेण विशिष्टायां शुभपुण्यतिथौ मम आत्मनः श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थं श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं अस्माकं सकुटुंबानां सहपरिवाराणां द्विपदचतुष्पदसहितानां क्षेमस्थैर्य आयुरारोग्य ऐश्वर्याद्यभिवृद्ध्यर्थं सर्वारिष्टनिरसनपूर्वकसमस्ताभ्युदयार्थे च ऋद्धिसिद्धिसहितश्रीमहागणपतिदेवताप्रीत्यर्थं यथाज्ञानेन यथामीलितोपचारद्रव्यैः ध्यानावाहनादिषोडशोपचारैः पूजां करिष्ये । तथा च कलशशंखघंटापूजनं शरीरशुद्ध्यर्थं षडंगन्यासं च करिष्ये ।

(असें म्हणून उदक सोडावें.)

आदौ निर्विघ्नतासिद्ध्यर्थं महागणपतिस्मरणं करिष्ये ।

याप्रमाणें उदक सोडून झाल्यावर गणपतिस्मरण हात जोडून करावें. तें असें:—

गणानांत्वा शौनको गृत्समदो गणपतिर्जगती गणपतिस्मरणे विनियोगः ।

ॐ गणानां त्वा गणपतिं हवामहे कविं कवीनामुपमश्रवस्तमं ।
ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पत आनः शृण्वन् नूतिभिः सीदसादनं ।।

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटिसमप्रभ ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ॥

श्रीमहागणाधिपतये नमः । निर्विघ्नं कुरु ।।

असें म्हणून गजाननाला नमस्कार करावा.

आसनविधिः—पृथिवीति मंत्रस्य मेरुपृष्ठ ऋषिः । कूर्मो देवता । सुतलं छंदः । आसने विनियोगः । ॐ **पृथ्वि त्वया धृता लोका देवि त्वं विष्णुना धृता । त्वं च धारय मां देवि पवित्रं कुरु चासनम् ॥ अपसर्पंतु ते भूता ये भूता भूमिसंस्थिताः । ये भूता विघ्नकर्तारस्ते नश्यन्तु शिवाज्ञया ॥ अपक्रामंतु भूतानि पिशाचाः सर्वतो दिशम् । सर्वेषामविरोधेन पूजाकर्म समारंभे** ॥ इति वामपादतलपार्श्वेन भूमिं त्रिः प्रहृत्य ।

(डाव्या पायाच्या तळाचा पार्श्वभाग तीन वेळां जमिनीवर लावावा.)

देवा आयान्तु । यातुधाना अपयान्तु । विष्णो देवयजनं रक्षस्व । भूमौ प्रादेशं कुर्यात् ।

(उजव्या हाताचा आंगठा व तर्जनी जमिनीला लावावी.)

मनुष्यगंधनिवारणविधिः—

येभ्यो मातेत्यस्य गयःप्लातो विश्वेदेवा जगती । मनुष्यगंधनिवारणे विनियोगः ।

ॐ येभ्यो माता मधुमत्पिन्वते पयः पीयूषं द्यौरदितिरद्रिबर्हाः ।
उक्थशुष्मान् वृषभरान्स्वप्नसस्ताँ आदित्याँ अनुमदा स्वस्तये ॥

एवापित्र इत्यस्य वामदेवो बृहस्पतिस्त्रिष्टुप् । मनुष्यगन्धनिवारणे विनियोगः

ॐ एवापित्रे विश्वदेवाय वृष्णे यज्ञैर्विधेम नमसा हविर्भिः ।
बृहस्पते सुप्रजा वीरवन्तो वयं स्याम पतयो रयीणाम् ॥

आतां शरीरशुद्ध्यर्थं षडंगन्यास करावा—

ॐ यत्पुरुषं व्यदधुः कतिधा व्यकल्पयन् ।
मुखं किमस्य कौ बाहू का ऊरू पादा उच्येते ॥

तर्जनी मध्यमा अनामिका या तीन बोटांनीं हृदयाय नमः म्हणून हृदयाला स्पर्श करावा.

ॐ ब्राह्मणोऽस्य मुखमासीद्बाहू राजन्यः कृतः ।
ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत ॥

अंगुली व मध्यमा या दोन बोटांनीं शिरसे स्वाहा म्हणून मस्तकाला स्पर्श करावा.

ॐ चन्द्रमा मनसो जातश्चक्षोः सूर्यो अजायत ।
मुखादिन्द्रश्चाग्निश्च प्राणाद्वायुरजायत ॥

तर्जनी, मध्यमा व अंगुष्ठ या तीन बोटांनीं शिखायै वषट् असें म्हणून शेंडीचे जागेवर स्पर्श करावा.

ॐ नाभ्या आसीदन्तरिक्षं शीर्ष्णो द्यौः समवर्तत ।
पद्भ्यां भूमिर्दिशः श्रोत्रात्तथा लोकाँ अकल्पयन् ॥

कवचाय हुम् असें म्हणून दोन्ही हातांच्या अंगुलीनीं स्कंधांपासून नाभीपर्यंत स्पर्श करावा.

ॐ सप्तास्यासन्परिधयस्त्रिःसप्त समिधः कृताः ।
देवा यद्यज्ञं तन्वाना अबध्नन्पुरुषं पशुम् ॥

नेत्रत्रयाय वौषट् असें म्हणून तर्जनी, मध्यमा व अनामिका या तीन बोटांनीं दोन नेत्र व ललाट यांना स्पर्श करावा.

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।
ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः ॥

अस्त्राय फट् असें म्हणून दोन्ही हातांनीं तीन वेळां टाळी वाजविणें. याप्रमाणें षडंगन्यास झाल्यावर कलश, शंख, घंटा, दीप यांची क्रमानें खालील मंत्रांनीं पूजा करावी.

तो क्रम असा—

प्रथम कलशावर हात ठेवून पुढील मंत्र म्हणावे—

कलशपूजनम्:—

ॐ आकलशेषु धावति पवित्रे परिषिच्यते । उक्थैर्यज्ञेषु वर्धते ।

कलशस्य मुखे विष्णुः कण्ठे रुद्रः समाश्रितः ।
मूले तत्र स्थितो ब्रह्मा मध्ये मातृगणाः स्मृताः ॥
कुक्षौ तु सागराः सर्वे सप्तद्वीपा वसुन्धरा ।
ऋग्वेदोऽथ यजुर्वेदः सामवेदो ह्यथर्वणः ॥
अङ्गैश्च सहिताः सर्वे कलशं तु समाश्रिताः ।
अत्र गायत्री सावित्री शान्तिः पुष्टिकरी तथा ॥
आयान्तु देवपूजार्थं दुरितक्षयकारकाः ।
गङ्गे च यमुने चैव गोदावरि सरस्वति ।
नर्मदे सिन्धु कावेरि जलेऽस्मिन् संनिधिं कुरु ॥

कलशदेवताभ्यो नमः । सर्वोपचारार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ।

असें म्हणून कलशाला गंधाक्षता फूल वहावें.

शंखपूजनम् :—

ॐ पांचजन्याय विद्महे पावमानाय धीमहि।
तन्नः शंखः प्रचोदयात् ॥
शङ्खादौ चन्द्रदैवत्यं कुक्षौ वरुणदेवता।
पृष्ठे प्रजापतिश्चैव ह्यग्रे गङ्गासरस्वती ॥
त्वं पुरा सागरोत्पन्नो विष्णुना विधृतः करे।
निर्मितः सर्वदेवैस्तु पाञ्चजन्य नमोस्तु ते ॥

शंखदेवताभ्यो नमः गंधपुष्पं समर्पयामि।

या मंत्रानें शंखाला धुवून गंधफूल लावावें.

घण्टापूजनम् :— आगमनार्थं तु देवानां गमनार्थं तु रक्षसाम्।
कुर्वे घण्टारवं तत्र देवताह्वानलक्षणम् ॥

घण्टादेव्यै नमः। सर्वोपचारार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि। घण्टानादं कुर्यात्।
असें म्हणून घंटेला गंध अक्षता फूल लावावें.

दीपपूजनम् :—

ॐ दिवे दिवे सदृशीरन्यमर्धं
कृष्णा असेधदप सद्मनोजाः।
अहं दासा वृषभोवस्नयंतो
दव्रजे वर्तिनं शंबरं च ॥
भो दीप ब्रह्मरूपस्त्वं ज्योतिषां प्रभुरव्ययः।
आरोग्यं देहि पुत्रांश्च सर्वार्थांश्च प्रयच्छ मे ॥

दीपदेवताभ्यो नमः सर्वोपचारार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि।

असें म्हणून गंध अक्षता फूल समईवर ठेवावें. समई वगैरे तेलाचा दिवा देवाचे डावीकडे ठेवावा. नंतर तुलसीपत्र किंवा दूर्वांकुर घेऊन पूजासाहित्यावर व आपले अंगावर कलशांतील उदक प्रोक्षण करावें. त्याचा मंत्र असा—

अपवित्रः पवित्रो वा सर्वावस्थां गतोऽपि वा।
यः स्मरेत् पुण्डरीकाक्षं स बाह्याभ्यन्तरः शुचिः ॥

पूजाद्रव्याणि संप्रोक्ष्य आत्मानं च प्रोक्षेत् ॥

ध्यानम् :– श्रीगणेशाची मूर्ति नेत्रांसमोर आणून हात जोडून खालील मंत्र म्हणावे—

ॐ एकदन्ताय विद्महे वक्रतुंडाय धीमहि।
तन्नो दन्ती प्रचोदयात् ॥
गजवदनमचिंत्यं तीक्ष्णदंष्ट्रं त्रिनेत्रं
बृहदुदरमशेषं भूतिराजं पुराणम्।
अमरवरसुपूज्यं रक्तवर्णं सुरेशं
पशुपतिसुतमीशं विघ्नराजं नमामि ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः। ध्यानं समर्पयामि।

असें म्हणून देवावर पुष्प समर्पण करावें अगर दूर्वांकुर वहावा.

आवाहनम्—पुढील मंत्रानें आवाहनार्थ दूर्वांकुर किंवा अक्षता वहाव्या व नमस्कार करावा.

ॐ सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात्।
स भूमिं विश्वतो वृत्वात्यतिष्ठद्दशाङ्गुलं ॥ १ ॥
आगच्छ देव देवेश तेजोराशे जगत्पते।
क्रियमाणां मया पूजां गृहाण गणनायक ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः आवाहनार्थे दूर्वांकुरं (अगर अक्षतान्) समर्पयामि।

आसनम् :— पुढील मंत्रानें देवाच्या पायांवर अक्षता वहाव्या.

ॐ पुरुष एवेदं सर्वं यद्भूतं यच्च भव्यं।
उतामृतत्वस्येशानो यदन्नेनातिरोहति ॥ २ ॥
नानारत्नसमायुक्तं कार्तस्वरविभूषितम्।
आसनं देवदेवेश गृहाण सुरपूजित।

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः। आसनार्थे दूर्वांकुरं समर्पयामि। किंवा अक्षतान् समर्पयामि। असें म्हणून दूर्वा किंवा अक्षता वहाव्या.

पाद्यम्—पुढील मंत्रानें गणपतीच्या पायावर पाणी घालवें.

ॐ एतावानस्य महिमातोज्यायांश्च पूरुषः ।
पादोस्य विश्वा भूतानि त्रिपादस्यामृतं दिवि ॥ ३ ॥

सर्वतीर्थसमानीतं पाद्यं गन्धादिसंयुतम् ।
विघ्नराज गृहाणेदं भगवन् भक्तवत्सल ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । पादयोः पाद्यं समर्पयामि ।

अर्घ्यम् :—पुढील मंत्रानें पळींत अगर भांड्यांत पाणी घेऊन त्यांत गंध, अक्षता, फूल, दूर्वांकुर व फळ (सुपारी) घालून देवाचे हातावर अर्घ्य द्यावें.

ॐ त्रिपादूर्ध्व उदैत्पुरुषः पादोस्येहाभवत्पुनः ।
ततोविष्वङ् व्यक्रामत्साशनानशने अभि ॥ ४ ॥

अर्घ्यं च फलसंयुक्तं गन्धपुष्पाक्षतैर्युतम् ।
गणाध्यक्ष नमस्तेऽस्तु गृहाण करुणानिधे ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । हस्तयोः अर्घ्यं समर्पयामि ॥

आचमनम्:—पुढील मंत्रानें शुद्ध पाण्यानें देवाला आचमन द्यावें. (थोडें पाणी मुखाशीं द्यावें.)

ॐ तस्माद्विराळ जायत विराजो अधिपूरुषः ।
स जातो अत्यरिच्यत पश्चाद्भूमिमथो पुरः ॥ ५ ॥

विनायक नमस्तुभ्यं त्रिदशैरभिवंदित ।
शुद्धोदकेन तोयेन शीघ्रमाचमनं कुरु ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । आचमनीयं समर्पयामि ॥

स्नानम्:—पुढील मंत्रानें देवाला स्नान घालवें.

ॐ यत्पुरुषेण हविषा देवा यज्ञमतन्वत ।
वसन्तो अस्यासीदाज्यं ग्रीष्मइध्मः शरद्धविः ॥ ६ ॥

गंगादिसर्वतीर्थेभ्य आनीतं तोयमुत्तमम् ।
भक्त्या समर्पितं तुभ्यं स्नानायाभीष्टदायक ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । स्नानं समर्पयामि ॥

या वेळीं देवाला पंचामृत स्नान घालावें. रोजच्या पूजेंत आवश्यक नाहीं. पण विशेषप्रसंगीं विनायकी चतुर्थी, संकष्टी चतुर्थी, गणेश चतुर्थी, सत्यविनायकव्रतांत अवश्य पंचामृत स्नान घालावें. तें पंचामृत एकत्र करून किंवा दूध, दहीं, तूप, मध, साखर या क्रमानें निरनिराळीं अर्पण करावीं. एकत्र असतां हा मंत्र म्हणावा—

पयो दधि घृतं चैव मधुशर्करया युतम् ।
पंचामृतेन स्नपनं क्रियतां परमेश्वर ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । पंचामृतस्नानं समर्पयामि ॥
पंचामृतस्नानांते शुद्धोदकस्नानं समर्पयामि । सकलपूजार्थे अक्षतान् समर्पयामि ॥

पयः—पंचामृतें निरनिराळीं असतां खालीलप्रमाणें प्रथमतः—(दूध)

ॐ आप्यायस्व समेतु ते विश्वतः सोमवृष्ण्यं ।
भवावाजस्य संगथे ।

कामधेनोः समुद्भूतं देवर्षिपितृतृप्तिदम् ।
पयो ददामि देवेश स्नानार्थं प्रतिगृह्यताम् ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । पयःस्नानं समर्पयामि ।
शुद्धोदकस्नानं समर्पयामि । सकलपूजार्थे अक्षतान् समर्पयामि ।

दूध घातल्यावर पाणी घालून अक्षता वहाव्या.

दधि—

ॐ दधिक्राव्णो अकारिषं जिष्णोरश्वस्य वाजिनः ।
सुरभिनोमुखाकरत्प्रण आयूंषि तारिषत् ॥ २ ॥

चंद्रमण्डलसंकाशं सर्वदेवप्रियं दधि ।
स्नानार्थं ते मया दत्तं प्रीत्यर्थं प्रतिगृह्यताम् ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । दधिस्नानं समर्पयामि । शुद्धोदकस्नानं समर्पयामि । सकलपूजार्थे अक्षतान् समर्पयामि ।
दहीं घातल्यावर पाणी घालून अक्षता वाहाव्या.

घृतं—

ॐ घृतंमिमिक्षे घृतमस्य योनिर्घृते श्रितो घृतम्वस्य धाम ।

अनुष्वधमावह मादयस्व स्वाहाकृतं वृषभवक्षिहव्यं ॥ ३ ॥

आज्यं सुराणामाहार आज्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ।
आज्यं पवित्रं परमं स्नानार्थं प्रतिगृह्यताम् ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः घृतस्नानं समर्पयामि । शुद्धोदकस्नानं समर्पयामि । सकलपूजार्थे अक्षतान् समर्पयामि ॥

देवाला तूप लावून पाणी व अक्षता वाहाव्या.

मधु—

ॐ मधुवाताऋतायते मधुक्षरन्तिसिन्धवः ।
माध्वीर्नः सन्त्वोषधीः ॥
मधुनक्तमुतोषसो मधुमत्पार्थिवं रजः ।
मधुद्यौरस्तु नः पिता ॥
मधुमान्नो वनस्पतिर्मधुमाँ अस्तु सूर्यः ।
माध्वीर्गावो भवन्तु नः ॥ ४ ॥

सर्वौषधिसमुत्पन्नं पीयूषसदृशं मधु ।
स्नानार्थं ते प्रयच्छामि गृहाण परमेश्वर ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपये नमः । मधुस्नानं समर्पयामि । शुद्धोदकस्नानं समर्पयामि । सकलपूजार्थे अक्षतान् समर्पयामि ।

मध घातल्यावर पाणी घालून अक्षता वाहाव्या.

शर्करा [साखर]

ॐ स्वादुःपवस्व दिव्याय जन्मने स्वादुरिन्द्राय सुहवीतुनाम्ने ।
स्वादुर्मित्राय वरुणाय वायवे बृहस्पतये मधुमाँ अदाभ्यः ॥

इक्षुदण्डसमुद्भूतदिव्यशर्करया हरिम् ।
स्नापयामि महाभक्त्या प्रीतो भव शिवात्मज ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । शर्करास्नानं समर्पयामि । शुद्धोदकस्नानं समर्पयामि । सकलपूजार्थे अक्षतात् समर्पयामि ॥

देवाचे अंगाला साखर लावून शुद्धोदक घालावें आणि अक्षता वाहाव्या.

याप्रमाणें पंचामृतस्नान झाल्यावर गंधोदकस्नान म्हणजे पळींत अगर भांड्यांत गंध घालून तें पाणी वाहावें.

गंधोदक —ॐ गंधद्वारां दुराधर्षां नित्यपुष्टां करीषिणीं ।
ईश्वरीं सर्वभूतानां तामिहोपह्वये श्रियं ॥ ६ ॥

कर्पूरैलासमायुक्तं सुगंधिद्रव्यसंयुतम् ।
गंधोदकं मया दत्तं स्नानार्थं प्रतिगृह्यताम् ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । षष्ठं गंधोदकस्नानं समर्पयामि । शुद्धोदकस्नानं समर्पयामि । सकलपूजार्थे अक्षतान् समर्पयामि ॥

याप्रमाणें हीं स्नानें झाल्यावर मांगलिकस्नान म्हणजे देवाचे अंगाला सुगंधी द्रव्यें-अत्तर वगैरे लावून उष्णोदक-कढत पाणी घालणें, याला अभ्यंग किंवा मांगलिकस्नान म्हणतात. त्याचा मंत्र—

अंगोद्वर्तनकं देव कस्तूर्यादिविमिश्रितम् ।
स्नानार्थं ते प्रयच्छामि स्वीकुरुष्व दयानिधे ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । मांगलिकस्नानं समर्पयामि । शुद्धोदकस्नानं समर्पयामि । सकलपूजार्थे अक्षतान् समर्पयामि ।

आतां देवाला चांगला धुवून नाममंत्रानीं पंचोपचार वाहावे. याला पूर्वपूजा म्हणतात, ते असे—

पूर्वपूजा—

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । विलेपनार्थे चंदनं समर्पयामि । [गंध लावावें.]
श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । पूजार्थे पुष्पाणि समर्पयामि [फुलें वाहावीं.]
श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । धूपं समर्पयामि । [धूप दाखवावा.]

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । दीपं समर्पयामि । [नीरांजन ओंवाळावें.]
श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । नैवेद्यार्थे पय, रंभाफल अथवा गुडोपहार नैवेद्यं समर्पयामि । (दूध, केळें किंवा गूळ यांचा नैवेद्य दाखवावा.)

नैवेद्य दाखवतांना पुढील मंत्र म्हणावे—

ॐ प्राणाय स्वाहा । ॐ अपानाय स्वाहा । ॐ व्यानाय स्वाहा ।
ॐ उदानाय स्वाहा । ॐ समानाय स्वाहा । ॐ ब्रह्मणे स्वाहा ।

नंतर पुढील मंत्र म्हणून पाणी सोडावें.

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । उत्तरापोशनं समर्पयामि । हस्तप्रक्षालनं समर्पयामि । मुखप्रक्षालनं समर्पयामि ।

पुढील मंत्र म्हणून देवापुढें विड्याचीं दोन पानें, त्यावर सुपारी व दक्षिणा ठेवून त्यावर पाणी सोडावें.

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । मुखवासार्थे पूगीफलतांबूलं दक्षिणां च समर्पयामि ।

पुढील मंत्रानें गंधफूल अक्षता वाहाव्या.

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । मंत्रपुष्पं समर्पयामि ।

पुढील मंत्रानें उदक सोडून नमस्कार करावा.

उत्तरे निर्माल्यं विसृज्य महाभिषेकं कुर्यात् ।

पूर्वी देवावर वाहिलेलीं फुलें उत्तरेकडे काढून ठेवावीं.

या पूजेनंतर देवावर अभिषेक करावा.

अनेन पूर्वाराधनेन श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतिः प्रीयताम् ।

अभिषेकः— देवावर पाण्याची संततधार धरणें किंवा पळीनें सतत पाणी घालणें. अभिषेकसमयीं पुरुषसूक्त (नंतर त्या त्या देवतांचीं वैदिक रुद्र, पवमान, गणपत्यथर्वशीर्ष, सौर, श्रीसूक्त इत्यादि सूक्तें म्हणतात. पौराण मंत्रही म्हणावे.) पुरुषसूक्त हें सर्व देवांकरितां म्हणावें. गणपतीकरितां अथर्वशीर्ष, येत असेल तर ब्रह्मणस्पतिसूक्त म्हणावें. गणपत्यथर्वशीर्ष पुस्तकांत दिलें आहे. एकवीस आवर्तनें करणें असेल तर ' ॐ नमस्ते गणपतये ' पासून ' वरदमूर्तये नमः ' पर्यंत वीस आवर्तनें म्हणावीं. शेवटच्या एकविसाव्या आवर्तनाचे वेळीं संपूर्ण म्हणावें. याप्रमाणें अभिषेकाचे शेवटीं पुढील मंत्र म्हणावा

आणि गंधाक्षता वाहून देवाला चांगलें धुवून पुसून नेहमींच्या जागेवर पुढील पूजेकरितां ठेवावें.

ॐ देवस्यत्वा सवितुः प्रसवेश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्यामग्ने-स्तेजसा सूर्यस्य वर्चसेन्द्रस्येंद्रियेणाभिषिंचामि ॥ बलाय श्रियै यशसेन्नाद्याय

ॐ भूर्भुवः स्वः अमृताभिषेकोऽस्तु । शांतिः पुष्टिः तुष्टिश्चास्तु । श्रीऋद्धिसिद्धि-सहितमहागणपतये नमः । महाभिषेकस्नानं समर्पयामि । शुद्धोदकस्नानं समर्पयामि । सकलपूजार्थे गन्धाक्षतान् समर्पयामि ।

नंतर पुढील मंत्र म्हणावे–

ॐ तदस्तु मित्रावरुणा तदग्ने शंयोरस्मभ्यमिदमस्तु शस्तं ।
अशीमहि गाधमुत प्रतिष्ठां नमो दिवे बृहते सादनाय ॥

गृहा वै प्रतिष्ठासूक्तं तत्प्रतिष्ठिततमया वाचा शंस्तव्यं तस्माद्यद्यपि दूर इव पशूँल्लभते । गृहानेवै नानाजिगमिषति गृहाहि पशूनां प्रतिष्ठा प्रतिष्ठा । सुप्रतिष्ठिमस्तु ॥

वस्त्रम्—पुढील मंत्रानें देवाला वस्त्र समर्पण करावें. तें नसेल तर दूर्वांकुर अक्षता वाहाव्या आणि देवाच्या हातावर पळीभर पाणी द्यावें.

ॐ तं यज्ञं बर्हिषि प्रौक्षन्पुरुषं जातमग्रतः ।
तेन देवा अयजन्त साध्या ऋषयश्च ये ॥

रक्तवस्त्रयुगं देव लोकलज्जानिवारणम् ।
अनर्घ्यमतिसूक्ष्मं च गृहाणेदं मयार्पितम् ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितश्रीमहागणपतये नमः वस्त्रार्थे दूर्वांकुर–अक्षतान् समर्पयामि । आचमनीयं समर्पयामि ।

उपवस्त्रम्:–पुढील मंत्रानें देवाला यज्ञोपवीत (जानवें) वहावें. तें नसेल तर अक्षता किंवा दूर्वांकुर वाहावें आणि आचमन द्यावें.

ॐ तस्माद्यज्ञात्सर्वहुतः संभृतं पृषदाज्यं ।
पशून्तांश्चक्रे वायव्यानारण्यान् ग्राम्याश्च ये ॥
राजतं ब्रह्मसूत्रं च काञ्चनं चोत्तरीयकम् ।
गृहाण चारु सर्वज्ञ भक्तानां वरदो भव ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । उपवस्त्रार्थें यज्ञोपवीतं समर्पयामि । आचमनीयं समर्पयामि ।

वस्त्र, उपवस्त्र–शेला जानवें अलंकार हे एकदां वाहिले तेच पुनः वाहण्यास हरकत नाहीं. ते निर्माल्य होत नाहींत असें वचन आहे.

गंधः–पुढील मंत्रानें देवाला रक्तचंदन–तांबडें गंध आवडतें तें भालप्रदेशीं लावावें.

ॐ तस्माद्यज्ञात्सर्वहुत ऋचःसामानि जज्ञिरे ।
छन्दांसि जज्ञिरे तस्माद्यजुस्तस्मादजायत ॥
श्रीखंडं चन्दनं दिव्यं गंधाढ्यं सुमनोहरम् ।
विलेपनं सुरश्रेष्ठ चंदनं प्रतिगृह्यताम् ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । चंदनं समर्पयामि ।

गंध लावल्यावर त्यावर पुढील मंत्रानें अक्षता लावाव्या—

रक्ताक्षतांश्च देवेश गृहाण द्विरदानन ।
ललाटपटले चन्द्रस्तस्योपरि विधार्यताम् ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । अक्षतान् समर्पयामि ।

अत्तर वगैरे सुगंधी द्रव्येंः—

पुढील मंत्रानें देवाला परिमलद्रव्यें अर्पण करावीं.

ॐ अहिरिव भोगैः पर्येति बाहुं ज्याया हेतिंपरिबाधमानः ।
हस्तघ्नो विश्वा वयुनानि विद्वान्पुमान्पुमांसं परिपातु विश्वतः ॥
ज्योत्स्नापते नमस्तुभ्यं नमस्ते विश्वरूपिणे ।
नानापरिमलद्रव्यं गृहाण परमेश्वर ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । परिमलद्रव्यं समर्पयामि ।

ऋद्धिसिद्धीनाः–हळद, कुंकू, काजळ, बांगड्या, मणीमंगलसूत्र, दागिने वगैरे यथासंभव अर्पण करावे. मंत्र पुढें देत आहें.

हळद :–हरिद्रा स्वर्णवभा सर्वसौभाग्यदायिनी ।
सर्वालंकारमुख्या हि देवि त्वं प्रतिगृह्यताम् ॥

श्रीऋद्धिसिद्धीभ्यां नमः हरिद्रां समर्पयमि ।

कुंकू :—हरिद्राचूर्णसंयुक्तं कुंकुमं कामदायकम् ।
वस्त्रालंकरणं सर्वं देवि त्वं प्रतिगृह्यताम् ॥

श्रीऋद्धिसिद्धीभ्यां नमः । कुंकुमं समर्पयामि ॥

काजळ :—कज्जलं कामिकं रम्यं कामिनीकामसंभवम् ।
नेत्रयोर्भूषणार्थाय कज्जलं प्रतिगृह्यताम् ॥

श्रीऋद्धिसिद्धीभ्यां नमः । कज्जलं समर्पयामि ।

मणिमंगलसूत्र :—माङ्गल्यतंतुमणिभिर्मुक्ताफलविराजितम् ।
कण्ठस्य भूषणार्थाय कण्ठसूत्रं प्रगृह्यताम् ॥

श्रीऋद्धिसिद्धीभ्यां नमः । कंठसूत्रं समर्पयामि ।

बांगड्या :—काचस्य निर्मितं दिव्यं कंकणं च सुरेश्वरि ।
हस्तालंकरणार्थाय कंकणं प्रतिगृह्यताम् ॥

श्रीऋद्धिसिद्धीभ्यां नमः । कंकणं समर्पयामि ।

ताडपत्र :—नानाभरणशोभाढ्यं नानारत्नोपशोभितम् ।
अर्पितं च मया देवि ताडपत्रं प्रगृह्यताम् ॥

श्रीऋद्धिसिद्धीभ्यां नमः । ताडपत्रं समर्पयामि ।

सिंदूर :—उदितारुणसंकाशं जपाकुसुमसंनिभम् ।
सीमंतभूषणार्थाय सिंदूरं प्रतिगृह्यताम् ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । सिंदूरं समर्पयामि ।

देवासह सर्वांना शेंदूर लावावा.

भूषणें अलंकार :—अनेकरत्नयुक्तानि भूषणानि बहूनि च ।
तत्तदंगे योजयामि कांचनानि तवाज्ञया ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । नानाभूषणानि समर्पयामि ।

देवाचे अंगावर दागिने घालावे. ते नसतील तर अक्षता वाहाव्या.

रोजच्या पूजेंत वरील उपचार आवश्यक नाहींत. हळद, कुंकू, सिंदूर हे मात्र तीन विशेषः गजाननाचे पूजेंत असावेत.

पुष्पम्:--आतां पुढील मंत्रांनीं देवाला प्रिय असलेलीं त्या त्या ऋतूंतील जीं फुलें असतील तीं भक्तीनें समर्पण करावीं.

गणेशाला तुळस वाहूं नये. बेल चालतो.

ॐ तस्मादश्वा अजायन्त ये केचोभयादतः ।
गावो ह जज्ञिरे तस्मात्तस्माज्जाता अजावयः ॥
माल्यादीनि सुगंधीनि मालत्यादीनि वै प्रभो ।
मयाहृतानि पूजार्थं पुष्पाणि प्रतिगृह्यताम् ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः यथालाभपुष्पाणि समर्पयामि । दूर्वांकुरान् शमीपत्राणि च समर्पयामि । शमीपत्र वाहतांना कांहीं ठिकाणीं खालील मंत्र म्हणतात.

शमीः--य इंद्राय वचोयुजा ततक्षुर्मनसाहरि ।
शमीभिर्यज्ञमाशत ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । शमीपत्राणि समर्पयामि ।

दूर्वाः--

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । दूर्वांकुरान् समर्पयामि ।

दूर्वा चांगल्या निवडलेल्या ३, ५ व ७ पत्रें असलेल्या असाव्या.

काण्डात्काण्डात्प्ररोहन्ति परुषः परुषः परि ।
एवानो दूर्वे प्रतनु सहस्रेणशतेनच ॥

यावेळींच २१ दूर्वा अथवा सहस्र दूर्वा किंवा शमीपत्रें वाहावयाचीं असतील तर तीं वाहावी. गंधाक्षतासहित दूर्वांकुर वाहावे. अग्रें आपलेकडे करावीं.

२१ दूर्वांची जुडी घेऊन गंधाक्षतांसह पुढें दिलेल्या मंत्रांनीं दोन दोन दूर्वा वाहाव्या व शेवटीं एक उरेल तीं संपूर्ण श्लोक म्हणून वाहावी.

ॐ गणाधिपाय नमः । दूर्वायुग्मं समर्पयामि ।
ॐ उमापुत्राय नमः । दूर्वायुग्मं समर्पयामि ।
ॐ अघनाशनाय नमः । दूर्वायुग्मं समर्पयामि ।
ॐ विनायकाय नमः । दूर्वायुग्मं समर्पयामि ।
ॐ ईशपुत्राय नमः । दूर्वायुग्मं समर्पयामि ।
ॐ सर्वसिद्धिप्रदायकाय नमः । दूर्वायुग्मं समर्पयामि ।
ॐ एकदन्ताय नमः । दूर्वायुग्मं समर्पयामि ।
ॐ इभवक्त्राय नमः । दूर्वायुग्मं समर्पयामि ।
ॐ मूषकवाहनाय नमः । दूर्वायुग्मं समर्पयामि ।
ॐ कुमारगुरवे नमः । दूर्वायुग्मं समर्पयामि ।
ॐ गणाधिप नमस्तेऽस्तु उमापुत्राघनाशन ।
विनायकेशपुत्रेति सर्वसिद्धिप्रदायक ॥
एकदन्तेभवक्त्रेति तथा मूषकवाहन ।
कुमारगुरवे तुभ्यं पूजयामि प्रयत्नतः ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः एकां दूर्वां समर्पयामि ।

अंगपूजा :- अंगपूजा म्हणजे देवाचे प्रत्येक अवयवाची पूजा. रक्ताक्षता घेऊन त्या त्या अवयवाचे ठिकाणीं पुढील नाममंत्रानें वहाव्या.

ॐ गणेश्वराय नमः पादौ पूजयामि ।	(पायांवर)
ॐ विघ्नराजाय नमः जानुनी पूजयामि ।	(ढोपरें)
ॐ आखुवाहनाय नमः ऊरू पूजयामि ।	(मांड्या)
ॐ हेरंबाय नमः कटी पूजयामि ।	(कंबर)
ॐ कामारिसूनवे नमः नाभिं पूजयामि ।	(बेंबी)
ॐ लम्बोदराय नमः उदरं पूजयामि ।	(पोटाचा भाग)
ॐ गौरीसुताय नमः स्तनौ पूजयामि ।	(स्तन)

ॐ गणनायकाय नमः हृदयं पूजयामि । (छाती)
ॐ स्थूलकर्णाय नमः कण्ठं पूजयामि । (कंठ)
ॐ स्कंदाग्रजाय नमः स्कंधौ पूजयामि । (खांदे)
ॐ पाशहस्ताय नमः हस्तान् पूजयामि । (हात)
ॐ गजवक्त्राय नमः वक्त्रं पूजायामि । (मुख)
ॐ विघ्नहर्त्रे नमः ललाटं पूजयामि । (भाल)
ॐ सर्वेश्वराय नमः शिरः पूजयामि । (मस्तक)
ॐ गणाधिपाय नमः सर्वांगं पूजयामि । (सर्वांग)

धूप :—पुढील मंत्रानें देवाला सुगंधी उदबत्ती लावून किंवा धूप, घंटा वाजवीत ओवाळावा.

ॐ यत्पुरुषं व्यदधुः कतिधा व्यकल्पयन् ।
मुखं किमस्य कौ बाहू का ऊरू पादा उच्येते ॥

वनस्पतिरसोद्भूतो गंधाढ्यो गंध उत्तमः ।
आघ्रेयः सर्वदेवानां धूपोऽयं प्रतिगृह्यताम् ॥

ऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । धूपं समर्पयामि ।

दीप :—पुढील मंत्रानें नीरांजन मधलें व करांगुलीजवळचें बोट आणि आंगठा यांनीं धरून देवाच्या पायांपासून मस्तकापर्यंत डाव्या हातानें घंटा वाजवीत ओंवाळावें. तुपाचा दिवा देवाचे उजव्या बाजूस ठेवावा.

ॐ ब्राह्मणोऽस्य मुखमासीद्बाहू राजन्यः कृतः ।
ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत ॥

आज्यं च वर्तिसंयुक्तं वह्निना योजितं मया ।
दीपं गृहाण देवेश ममाज्ञानं निवारय ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । दीपं समर्पयामि ॥

नैवेद्य :— नैवेद्याकरितां देवापुढें दूध-साखर, गूळ जे पदार्थ असतील ते ठेवावे. प्रथम खालीं पाण्यानें चौकोनी मण्डल करावें. त्यावर नैवेद्याचे पदार्थ ठेवावे. आणि पुढील मंत्र म्हणावे.

ॐ चन्द्रमा मनसो जातश्चक्षोः सूर्यो अजायत ।
मुखादिन्द्रश्चाग्निश्च प्राणाद्वायुरजायत ॥

नैवेद्यं गृह्यतां देव भक्तिं मे ह्यचलां कुरु ।
ईप्सितं मे वरं देहि परत्र च परां गतिम् ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । नैवेद्यार्थे पयोनैवेद्यं दूध असेल तर समर्पयामि । गूळ असेल तर गुडनैवेद्यं समर्पयामि । साखर असेल तर शर्करा नैवेद्यं समर्पयामि । असें म्हणावें. पदार्थांचें नांव माहीत नसेल तर खाद्यनैवेद्यं समर्पयामि । असें मोघम म्हणावें. नंतर नैवेद्य पदार्थांचे सभोंवार पाणी फिरवून नेत्र मिटून देवाची मूर्ति समोर आणून देवाला एकेक घांस देत आहोंत अशी कल्पना असावी.

ॐ प्राणाय स्वाहा । ॐ अपानाय स्वाहा । ॐ व्यानाय स्वाहा ।
ॐ उदानाय स्वाहा । ॐसमानाय स्वाहा । ॐ ब्रह्मणे स्वाहा ॥

नैवेद्यमध्ये पानीयं समर्पयामि ।

मध्यें पळीभर पाणी द्यावें. पुनः प्राणाय स्वाहा । इत्यादि सहामंत्रांनीं सहा घांस दिल्याची भावना करून उत्तरापोशनं हस्तप्रक्षालनं मुखप्रक्षालनं समर्पयामि ।

असें म्हणून पुनः पाणी सोडावें.

करोद्वर्तनार्थे चंदनं समर्पयामि ।

असें म्हणून देवावर गधफूल वाहावें. पुढील मंत्रानें देवापुढें विडा त्यावर दक्षिणा ठेवून विड्यावर पाणी सोडावें.

तांबूल :-**पूगीफलं महद्दिव्यं नागवल्ल्या दलयुतम् ।**
कर्पूरैलासमायुक्तं ताम्बूलं प्रतिगृह्यताम् ॥

असें म्हणून विड्यावर पाणी सोडावें. केळें, नारळ जें फल असेल तें ठेवून त्यावर पुढील मंत्र म्हणून पाणी सोडावें. गंधाक्षता कोणी घालतात.

फल :- **इदं फलं मया देव स्थापितं पुरतस्तव ।**
तेन मे सुफलावाप्तिर्भवेज्जन्मनि जन्मनि ॥
फलेन फलितं सर्वं त्रैलोक्यं सचराचरम् ।
तस्मात् फलप्रदानेन सफलाश्च मनोरथाः ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । फलार्थे नारीकेलफलं किंवा कदलीफलं समर्पयामि ।

दक्षिणाः–पुढील मंत्र म्हणून यथाशक्ति महादक्षिणा देवासमोर ठेवून त्या दक्षिणेवर पाणी सोडावें.

हिरण्यगर्भगर्भस्थं हेमबीजं विभावसोः ।
अनंतपुण्यफलदमतः शान्तिं प्रयच्छ मे ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । सुवर्णपुष्पदक्षिणां समर्पयामि ।

नित्याच्या पूजेंत–तांबूल, दक्षिणा व फळ हे उपचार असावे असें नाहीं. असतील तर वरील मंत्रानें समर्पण करावे. यानंतर नित्याचे मुख्य उपचार म्हणजे–प्रदक्षिणा, नमस्कार व मंत्रपुष्प हे होत. पण विशेषप्रसंगीं महानीरांजनविधी–काडवाती लावून पुनः दीप पुढील मंत्र म्हणून ओवाळणें.

महानीरांजनः—

ॐ श्रिये जातः श्रिय आनिरीयाय श्रियं वयोजरितृभ्यो ददाति ।
श्रियं वसाना अमृतत्वमायन्भवन्ति सत्यासमिथा मितद्रौ ॥

श्रिय एवैनं तच्छ्रियामादधाति संततमृचा वषट्कृत्यं संतत्यै संधीयते प्रजया पशुभिर्य एवं वेद । याज्यया यजति प्रत्तिर्वैयाज्या पुण्यैव लक्ष्मीः पुण्यामेव तल्लक्ष्मीं संभावयति पुण्यां लक्ष्मीं संस्कुरुते ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः महानीरांजनदीपं समर्पयामि ।

नंतर शक्य असेल तर कापूर लावावा.

कर्पूरपूरेण मनोहरेण सुवर्णपात्रोदरसंस्थितेन ।
प्रदीप्तभासा सहसंगतेन नीरांजनं ते जगदीश कुर्वे ॥

ऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । कर्पूरदीपं समर्पयामि ।

प्रदक्षिणाः—पुढील मंत्रानें प्रदक्षिणा घालाव्या.

ॐ नाभ्या आसीदन्तरिक्षं शीर्ष्णो द्यौः समवर्तत ।
पद्भ्यां भूमिर्दिशः श्रोत्रात्तथा लोकाँ अकल्पयन् ॥

यानिकानि च पापानि जन्मांतरकृतानि च ।
तानि तानि विनश्यंति प्रदक्षिणपदे पदे ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः प्रदक्षिणा समर्पयामि ।

नमस्कारः–पुढील मंत्रानें देवाला १, ३, ५, ७ नमस्कार घालावे. निदान एकतरी नमस्कार घालवाच.

ॐ सप्तास्यासन्परिधयस्त्रिः सप्त समिधः कृताः ।
देवा यद्यज्ञं तन्वाना अबध्नन्पुरुषं पशुम् ॥

द्विरदासुरदर्पघ्न अंतराणां च नाशक ।
विनायक गुरुश्रेष्ठ नमस्कारान् करोमि ते ॥

पुष्पांजलिः–नंतर पुढील मंत्रानें गंधअक्षतांसह ओंजळींत पुष्पें घेऊन देवाचे चरणावर अर्पण करावीं.

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।
तेह नाकं महिमानः सजन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः ॥

नमस्ते विघ्नसंहर्त्रे नमस्ते ईप्सितप्रद ।
नमस्ते देवदेवेश नमस्ते गणनायक ॥

श्रीऋद्धिसिद्धिसहितमहागणपतये नमः । पुष्पांजलिं समर्पयामि ।

यावेळीं देवे म्हणावे.

प्रार्थनाः–नंतर हातांत फूलें घेऊन हात जोडून पुढील प्रमाणें प्रार्थनामंत्र म्हणून गणपतीला अर्पण करावीं.

ॐ अयं मे हस्तो भगवानयं मे भगवत्तरः ।
अयं मे विश्वभेषजोऽयं शिवाभिमर्शनः ॥
अयं मातायं पितायं जीवातुरागमत् ।
इदं तव प्रसर्पणं सुबन्धवेहि निरिहि ॥

नमो नमः शाश्वतशान्तिहेतवे क्षमादयापूरितचारुचेतसे ।
परस्य पुंसः प्रथमाय सूनवे गजेन्द्ररूपाय गणेशश्वराय ते ॥
दीनानाथ दयानिधे सुरगणैः संसेव्यमान प्रभो
भक्तिं मे सफलां कुरुष्व सकलान् क्षान्त्यापराधान् मम ॥
आवाहनं न जानामि न जानामि विसर्जनम ।
पूजां चैव न जानामि क्षम्यतां परमेश्वर ॥
अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम ।
तस्मात्कारुण्यभावेन रक्षस्व परमेश्वर ॥
अपराधसहस्राणि क्रियन्तेऽहर्निशं मया ।
दासोयमिति मां मत्वा क्षमस्व परमेश्वर ॥
मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं सुरेश्वर ।
यत्पूजितं मया देव परिपूर्णं तदस्तु मे ॥

